**<u>ठळक बातम्या</u>**

- महाराष्ट्रातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीची मतमोजणी सुरु / बहुतेक ठिकाणी भाजपा आघाडीवर

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीच्या भारत मंडपम इथं स्टार्ट अप महोत्सवाचं उद्घाटन

- वादग्रस्त न्यायाधीश यशवंत वर्मांच्या चौकशीला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली

**आणि**

- भारतीय जनता पक्षाच्या नव्या अध्यक्षांची औपचारिक घोषणा येत्या २० जानेवारीला

**<><><><><>**

राज्यातल्या २९ महानगरपालिका निवडणुकीसाठीच्या मतमोजणीला आज सकाळी दहा वाजता सुरुवात झाली. सर्व महानगरपालिकांमधे सुरुवातीचे कल समोर येत असून काही ठिकाणी निकाल स्पष्ट झाले आहेत.

सुरुवातीच्या कलांनुसार मुंबईत २५ वॉर्डमध्ये भाजपा आणि ९ मध्ये शिवसेना आघाडीवर आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष २३ आणि मनसे ३ जागांवर आघाडीवर असल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

नवी मुंबईत भाजपा ७२, शिवसेना २८, उद्धव ठाकरेंचा पक्ष २, आणि अपक्ष १ जागेवर आघाडीवर आहे.

पुणे महापालिकेत भाजपा ४४, राष्ट्रवादी काँग्रेस ६, काँग्रेस ५ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष ३ जागांवर आघाडीवर आहे.

नागपुरात ७५ जागांवर भाजपाचे उमेदवार आगाडीवर आहेत. काँग्रेस २२, MIM 4, शिवसेना २ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष एका जागेवर आघाडीवर आहे.

मालेगावमध्ये ८४ पैकी ४९ जागांचे निकाल जाहीर झाले आहेत. त्यात सर्वाधिक १९ जागांवर इस्लाम पक्षानं १९ जागांवर विजय मिळवला. शिवसेना १८, समाजवादी पक्ष ५, MIM 4, भाजपा २ आणि काँग्रेस एका जागेवर विजयी झाली आहे.

चंद्रपुरात काँग्रेस १२, ठाकरेंची शिवसेना ७, भाजपा ७, MIM 1 जागांवर आघाडीवर आहेत.

परभणीत ठाकरेंची शिवसेना २७, भाजपा १३, काँग्रेस १०, राष्ट्रवादी काँग्रेस ६, शिवसेना २ जागांवर आघाडीवर आहेत.

छत्रपती संभाजीनगरमध्ये पहिल्या फेरीअखेर भारतीय जनता पक्ष १२, शिवसेना सहा, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष पाच, एमआयएम पाच, काँग्रेस तीन, राष्ट्रवादी काँग्रेस एक, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष एका जागेवर आघाडीवर आहे.

लातूर महानगरपालिकेत काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी बहुमताकडे वाटचाल करत असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. एकूण सत्तर जागांपैकी हाती आलेल्या निकालापैकी २९ जागांवर काँग्रेसनं विजय मिळवला आहे. १२ जागांवर भाजप आणि वंचित बहुजन आघाडीने सर्व पाच जागांवर विजय मिळाला.

जालना महापालिकेत आतापर्यंत जाहीर झालेल्या निकालानुसार भाजपनं २०, काँग्रेस तीन शिवसेनेनं एक, तर एक जागा अपक्ष उमेदवारानं जिंकली आहे. प्रभाग एक आणि पाच मध्ये सर्व भाजपचे उमेदवार विजयी झाले.

कोल्हापूर महानगरपालिकेत भाजपचे आठ, काँग्रेसचे तीन, शिवसेना एक, तर राष्ट्रवादी काँग्रेसचा एक उमेदवार विजयी झाला.

रायगड जिल्ह्यात पनवेल महापालिकेतल्या ७८ जागांपैकी २२ जागांचे निकाल हाती आले असून, सतरा जागांवर भाजप, कॉग्रेस एक, शिवसेना उद्धव बाळासाहेब पक्ष एक आणि शेतकरी कामगार पक्षाने तीन जागांवर विजय मिळवला आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या महानगरपालिका निवडणुकीत मतदारांच्या बोटावर लावलेल्या शाईच्या दर्जावरून झालेल्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर, काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज निवडणूक आयोगावर टीका केली. मतचोरी हे देशविरोधी कृत्य असल्याचा पुनरुच्चार त्यांनी एका वृत्तपत्रातल्या बातमीचा फोटो समाजमाध्यमावर शेअर करून केला.

या आरोपांना भाजपानं प्रत्युत्तर दिलं. मतमोजणी संपायच्या आधीच काँग्रेस पराभव मान्य करत आहे, असं भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते शहजाद पूनावाला यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. राहुल गांधी यांचा मतचोरीचा आरोप बिनबुडाचा आणि स्वतःचं अपयश लपवण्याचा प्रयत्न असल्याची टीका त्यांनी केली.

या निवडणुकीत मतदार याद्या आणि इतर अनेक घोळ झाल्याचा आरोप खासदार संजय राऊत यांनी आज पत्रकार परिषदेत केला.

- ***- होल्ड... बाईट- संजय राऊत - -***

- **<><><><><>**

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकीच्या निकालांचं विश्लेषण करणारा विशेष कार्यक्रम ‘निवाडा महानगरांचा’, आकाशवाणी मुंबईच्या प्रादेशिक वृत्त विभागातर्फे सादर करण्यात येणार आहे. आज रात्री ८ वाजून १० मिनिटांपासून हा कार्यक्रम आपल्याला ऐकता येईल. दररोज रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणारं राष्ट्रीय बातमीपत्र आज रात्री ८ वाजता प्रसारित होईल.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीच्या भारत मंडपम इथं स्टार्ट अप महोत्सवाचं उद्घाटन होणार आहे. स्टार्ट अप संकल्पना कार्यान्वित झाल्याच्या दशकपूर्तीनिमित्त या विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. १६ जानेवारी २०१६ रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या उपक्रमाचा प्रारंभ केला होता. नवोन्मेषाला चालना, उद्योजकतेला प्रोत्साहन आणि गुंतवणूक-आधारित विकास हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. आजपर्यंत भारतात दोन लाखांहून अधिक स्टार्टअप्सना मान्यता मिळाली आहे. २०१४ नंतर दीड लाखापेक्षा जास्त नवीन उपक्रम सुरु झाले, सुमारे साडे १७ लाख रोजगारनिर्मिती झाली असून, भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाची स्टार्टअप परिसंस्था ठरला आहे.

**<><><><><>**

अलाहाबाद उच्च न्यायालयाचे वादग्रस्त न्यायाधीश न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्यावरच्या भ्रष्टाचारांच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयानं आज फेटाळली. न्यायमूर्ती दीपांकर दत्ता

आणि न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा यांच्या पीठानं हा निकाल दिला. न्यायमूर्ती वर्मा यांच्याविरोधात लोकसभा आणि राज्यसभेत एकाच दिवशी महाभियोगाचा प्रस्ताव आणला होता, मात्र लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी राज्यसभेच्या अध्यक्षांच्या निर्णयाची वाट न पाहता किंवा कायद्यात सांगितल्याप्रमाणे एकत्रित चर्चा न करता स्वतःहून चौकशी समिती स्थापन केली, असा आक्षेप न्यायमूर्ती वर्मा यांच्या वकिलांनी घेतला. मात्र, राज्यसभेत हा प्रस्ताव फेटाळल्यानंतर लोकसभेचे सभापती चौकशी समिती स्थापन करू शकतात, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयानं याआधीच्या सुनावणीदरम्यान दिला होता.

**<><><><>**

भारतीय जनता पक्षाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीचा कार्यक्रम आज जाहीर झाला. यासाठी १९ जानेवारीला उमेदवारी अर्ज दाखल करता येतील आणि २० जानेवारीला नव्या अध्यक्षाच्या नावाची घोषणा होईल. भाजपाचे कार्यकारी अध्यक्ष नितीन नबीन यांची अध्यक्षपदावर बिनविरोध निवड होण्याची शक्यता असल्यानं ही निवडणूक फक्त एक औपचारिकता असेल.

**<><><><>**

तृणमूल काँग्रेसचे आमदार मुकुल रॉय यांची आमदारकी रद्द करण्याच्या कोलकाता उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयानं आज स्थगिती दिली. २०२१च्या निवडणूक रॉय यांनी भाजपाच्या तिकिटावर लढवली होती आणि निवडणुकीनंतर त्यांनी तृणमूल काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यामुळे पक्षांतरबंदी कायद्यानुसार कोलकाता उच्च न्यायालयानं त्यांची आमदारकी रद्द केली होती.

**<><><><>**

सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने सांख्यिकी क्षेत्रातल्या सुखात्मे राष्ट्रीय पुरस्कारासाठी नामांकन अर्ज मागवले आहेत. थोर सांख्यिकीतज्ज्ञ पांडुरंग वासुदेव सुखात्मे यांच्या स्मरणार्थ अधिकृत सांख्यिकी प्रणाली सुधारणा आणि संशोधन कार्यात मोलाचं योगदान देणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो. येत्या ३१ तारखेपर्यंत राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवर नामांकनं पाठवता येतील.

**<><><><>**

जम्मू काश्मीरच्या राजौरी जिल्ह्याच्या काकोरा गावात आज सुरक्षा दलांनी काही अत्याधुनिक स्फोटकं निकामी केली. बॉम्बशोधक पथकाला गस्तीदरम्यान एका बंद बॅगेत तब्बल साडेतीन किलो स्फोटकं लपवलेली आढळली. स्फोटकं निकामी केल्यामुळे कोणतीही जिवित किंवा वित्तहानी झाली नाही.

<><><><><>

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे आणि ज्येष्ठ कामगार नेते चंद्रशेखर बसु यांचे आज पहाटे कोलकात्याच्या बिधाननगर इथल्या निवासस्थानी निधन झालं. ते १०३ वर्षांचे होते. भारतीय आयुर्विमा महामंडळातल्या कर्मचारी संघटना उभारणीत त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका होती. त्यांच्या निधनाबद्दल अनेक मान्यवरांनी तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

<><><><><>

इराणमधे हिंसक निदर्शनं थांबवण्यासाठी आपण हरतऱ्हेचे उपाय करण्याचा विचार करत असल्याचं अमेरिकेने म्हटलं आहे. आंदोलकांच्या हत्या थांबवण्यासाठी सगळे पर्याय खुले असल्याचं अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी याआधीच स्पष्ट केल्याचं, संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेतले अमेरिकेचे स्थायी प्रतिनिधी माईक वॉल्ट्झ यांनी न्यूयॉर्कमधे झालेल्या सुरक्षा परिषदेच्या तातडीच्या बैठकीत सांगितलं. गेल्या आठवड्याच्या तुलनेत निदर्शनांचा जोर ओसरला असल्याचं संयुक्त राष्ट्रांच्या सहाय्यक महासचिव मार्था पोबी यांनी सांगितलं.

<><><><><>

केंद्र सरकार येणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात बियाणे विधेयक २०२६ आणणार आहे. केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी आज नवी दिल्लीत ही माहिती दिली. या विधेयकामुळे निकृष्ट आणि बनावट बियाणांच्या अनधिकृत विक्रीला प्रतिबंध होणार असून शेतकऱ्यांनी उच्च दर्जाचं प्रमाणित बियाणं मिळणं शक्य होणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

महिला क्रिकेट प्रिमियर लिग मध्ये आज गुजरात जायंट्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यातली लढत नवी मुंबईच्या डीवाय पाटील स्टेडियमवर होणार आहे. सामना आज संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल.

//<><><><><>//